पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९.
जा.क्र.इक्षेका/४/कावि/३०८/२०१८
दिनांक- २४/१०/२०१८

प्रति,

मा.----------------------------
सदस्य/सदस्या
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०२/११/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित केलेबाबत.**

**महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **शुक्रवार दिनांक ०२/११/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा.** इ क्षेत्रीय कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती
भोसरी, पुणे-३९

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख
मासिक सभेचे वेळी आपले विभागाशी संबंधीत विषयाबाबत सविस्तर टिपण/माहितीसह उपस्थित राहावे.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## इ प्रभाग समिती

## कार्यपत्रिका क्रमांक – ०८

**दिनांक- ०२ / ११/२०१८ रोजी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा **शुक्रवार दिनांक ०२/११/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा.** वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ०७/०९/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ६) सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक ०५/१०/२०१८ व ८/१०/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ७) सभावृत्तांत कायम करणे.

**विषय क्र.१)** प्रभाग क्र.५ मधील सखुबाई उद्यानाजवळील शौचालय, पैसे द्या व वापरा या तत्वावर देणेबाबत. स्थापत्य विभागाकडील पत्र क्र. इ/स्था/कावि/१११५/२०१८, दिनांक २३/१०/२०१८ चे पत्र. प्रभाग क्र.५ मधील सखुबाई उद्यानाजवळील शौचालय इमारत पैसे द्या व वापरा तत्वावर मे.सुविधा इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन या संस्थेस देखभाल दुरुस्तीसाठी देणेबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय यांनी शिफारस केली आहे तरी सदर शौचालय मे.सुविधा इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन या संस्थेस देखभाल दुरुस्तीसाठी ३० वर्षे देणेकामी मा. इ प्रभाग समितीची प्रशासकीय मान्यता घेण्याकामी सदर विषय मा. इ प्रभाग समितीपुढे मान्यतेकामी ठेवण्यात येत आहे.

**विषय क्र.२)** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक ५ व ७ मध्ये दिघीफाटा ते सॅण्डविक कॉलनी, आदर्श शाळेपर्यंत असलेली पाण्याची पाईप लाईन पाणी कमी पडत असल्याने एक पाईप लाईन जादा टाकण्यात आलेली आहे. काही नळ कनेक्शन नवीन पाईपवर घेण्यात आले आहेत. व काही नळ कनेक्शन हे जुन्या पाईप लाईनवर आहे. परंतू जुन्या पाईप लाईनवर नवीन पाईप लाईनवर असल्यामुळे जुने नळ कनेक्शन पुर्णपणे बंद केलेले नाही त्यामुळे जमिनीखाली मोठया प्रमाणावर पाण्याची गळती होत असल्याने नागरीकांना पाणीपुरवठा कमी प्रमाणात होत असल्याने नागरीकांच्या तक्रारी वाढतात. तरी पाणीपुरवठा विभागाने ते दोन्ही पाईप लाईनची तपासणी व होत असलेली पाणी गळती तात्काळ बंद करण्यात यावी. सदर विषय इ प्रभाग समितीच्या मासिक सभेत मान्यतेकामी ठेवण्यात येत आहे.

मा.सभापती यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय घेणे.

प्रशासन अधिकारी तथा<br>
सचिव (सभाशाखा)<br>
इ प्रभाग समिती<br>
भोसरी, पुणे-३९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९<br>
जा.क्र.इक्षेका/४/कावि/२५९ /२०१८

दिनांक- २५/१०/२०१८